REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2021

# संत तुकाराम
# चरित्र आणि कार्य

प्रा.डॉ. रवींद्र सोमोशी
सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर, रायगड.

सारांश–



तुकारामांच्या अभंगाचे महत्त्व स्पष्ट करीत शं.दा.पेंडसे लिहितात, ''भागवत धर्ममंदिराचा कळस बनलेले संतकवी तुकाराम हे मराठी सारस्वताचे एक उत्तुंग शिखर ठरले. तुकारामांच्या अभंगवाणीचा स्पर्शही ज्याला झाला नाही, असा कुणी मराठी मनुष्य असेल असे वाटत नाही. त्यांची किर्ती या महाराष्ट्राने आपल्या ह्दयात खोलवर जपून ठेवली आहे. महाराष्ट्राच्या जीवनाचे तिचे दीर्घ आणि दृढ संस्कार झाले आहेत. तुकारामांचे व्यक्तित्त्व केवळ समर्थ आणि संपन्न आहे असे म्हणण्यात विशेष नवीन काही नाही, पण त्याकडे पाहत रहावे अशी एक लक्षणीयताही त्यांच्यात आहे.''[१]

खरे तर तुकाराम हा एक सर्वसाधारण संसारी मनुष्य, मळलेल्या वाटेने चालत राहिलेला एक सामान्य माणूस. सामान्य माणसाच्या वाट्याला येणारी सारी सुख-दु:खे त्यांच्याही पदरात पडली, पण काही माणसे आपल्या सुखदु:खांकडे विशेष लक्षपूर्वक पाहू शकतात. आपल्या आयुष्याचा अर्थ लावण्याची धडपड ते करीत असतात. बहुसंख्य लोक असा विचार न करता चालत राहतात आणि एक दिवस त्यांची वाट अंधारात दिसेनाशी होते. तुकाराम मात्र आपल्या जीवनात उद्‌भवणाऱ्या प्रत्येक संकटांच्या क्षणाने सावध होते. सुख-दु:खाच्या स्वरूपाचा शोध घेत होते. या संदर्भात निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''त्यांच्या या आंतरिक प्रवृत्तीमुळेच प्रवाहाबरोबर अगतिकपणे वाहत जाण्याला त्यांनी नकार दिला. त्यांच्याबरोबर वाहवत चाललेले लोक त्यांना दिसत होते. उद्दाम वेगाने वाहणाऱ्या लोंढ्याला अटकाव करण्यात अर्थ नसतो, हे समजण्याचा व्यावहारिक शहाणपणा तुकोबात नव्हता. धिटाईने प्रवाहाचा आवेग आपल्या छातीवर झेलण्याचा प्रयत्न ते करू लागले. या चमत्कारिक संघर्षात अनेक वेळा त्यांना पराभूत व्हावे लागले. अदृश्य नियती या सामान्य भासणाऱ्या माणसातील असामान्यत्त्वाला आव्हान देत होती. सर्वसमर्थ नियतीपुढे आपण गलितगात्र झालो आहोत, असे मात्र या चिवट वृत्तीच्या माणसाला वाटले नाही. आपले सारे बळ एकवटून तो झगडत होता, झुंजत होता. तुकारामांचे सारे आयुष्य आणि काव्य हे त्यांनी केलेल्या अखंड संघर्षाचे एक प्रतिक आहे. शरणागती न पत्करणारी माणसे आपल्या बंडखोरीमुळेच बिकट वाटेने चालू लागतात.''[२] खरोखर संत तुकाराम म्हणजे निर्भिड वृत्तीचे एक बंडखोर व्यक्तित्त्व असल्यामुळेच ते प्रवाहाबरोबर वाहत न जाता त्यांनी आपला नवा मार्ग तयार केला. त्या मार्गावर त्यांना सतत संघर्षरत रहावे लागले.

संज्ञा – मराठी साहित्यात, वारकरी संप्रदाय, अभंग

**प्रस्तावना –**

वारकरी संप्रदायातील संत तुकारामांची गाथा व त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्त्व मध्ययुगीन मराठी साहित्यात महत्त्वाचे आहे. म्हणून संत तुकारामांचे चरित्र व कार्य संशोधनाच्या अनुषंगाने महत्त्वाचे ठरणार आहे.

**१. पार्श्वभूमी :-**

तुकाराम महाराज हे महान साक्षात्कारी संत होते. भारतीय साक्षात्कारी सत्पुरुषांच्या परंपरेत त्यांचे स्थान फार मोठे आहे. ईश्वराचा साक्षात्कार होऊन प्रसाद प्राप्त होणे आणि त्यामुळे संपूर्ण जीवन उजळून आनंदमय होण्याचे भाग्य फार थोड्यांना लाभते. संत तुकाराम असे भाग्यवान पुरुष होते, आपल्याला आधी साक्षात्कार म्हणजे काही गुढ किंवा अशक्य गोष्ट आहे असे वाटत असते आणि ती शक्यतेच्या कोटीतील मानली तरी तिचा अनुभव येण्याइतकी आपली पूर्वतयारी नसते. तुकारामांच्या हृदयाला लागलेली तीव्र तळमळ आपल्या अंतकरणात उत्पन्न होत नाही.

वस्तुतः ईश्वर आपल्या हृदयात आहे. आयुष्यातील अनेक घटनांनी तो आपले अस्तित्त्व वारंवार दाखवित असतो, पण तिकडे आपले लक्ष नसते. त्याच्या साक्षात्कारावर विश्वास असणाऱ्या आणि नसणाऱ्या आस्तिकांना व नास्तिकांनाही, साक्षात्कार म्हणजे काय? ते समजण्यास तुकाराम महाराजांचे अनुभव उपयुक्त होणार असल्यामुळे ते मुद्दामच सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संत तुकारामांनी ईश्वराचे अस्तित्त्व सद्सद्विवेकाच्या अंतःकरणातच असल्याचे नमूद केले. म्हणून स्वामी चंद्रशेखरेंद्र यांच्या विवेचनातील मत या अनुषंगाने महत्त्वाचे ठरते.

‘‘शुचिनाम् श्रीमताम् गेहे’’

तुकारामांचे वडील बोल्होबा व आई कनकाई यांनी विठ्ठलाच्या उपासनेचे व्रत घरात अखंड चालू ठेवले होते. ते संस्कार तुकाराम आणि त्यांचे बंधू सावजी व कान्होबा यांच्या मनात पूर्णपणे उतरले. हे घराणे श्रद्धाळू, ईश्वरनिष्ठ, सत्प्रवृत्त व संस्कार संपन्न होते. यामुळेच त्यांच्या अभंगवाणीत या साऱ्या विशेषांचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ‘‘बालपणापासूनच तुकारामांच्या कानमनावर विठ्ठलाचे नाव पुनःपुन्हा येत होते आणि ते त्यांच्या चित्तात रूजत होते. त्यांच्या व्यक्तित्त्वाने पुढे जी वळणे घेतली आणि विकासाच्या अथांग आकाशात जी झेप घेतली, त्याचे मूळ बालपणी झालेल्या या धार्मिक संस्कारातच आहे.’’[३] वरील निर्मलकुमार फडकुले यांचे मत संत तुकारामांच्या व्यक्तित्त्वसंदर्भाने यथोचित आहे. एकूणच वारकरी संप्रदायातील संतांच्या अभंगाचे मूळसुत्र भक्ती आहे. विठ्ठल आणि संत यांचे नाते अद्वितीय स्वरूपाचे आहे. याच धार्मिक संस्काराने तुकारामांचे व्यक्तित्त्व आणि अभंगवाङ्मय समृद्ध होत गेले.

**२. जन्म आणि बालपन :-**

एकनाथांनी शके १५२१ मध्ये पैठणला गोदावरीकाठी समाधी व त्यानंतर आठ-नऊ वर्षांनीच, ज्ञानदेवांच्या आळंदीपासून जवळच असणाऱ्या इंद्रायणीकाठच्या देहू क्षेद्रात शके १५३० मध्ये तुकारामांचा जन्म एका शुचि व श्रीमंत घराण्यात झाला. तुकारामांचे घराणे ‘शुचि’ होते, कारण तुकारामांच्या पूर्वीच्या आठव्या पिढीचे पूर्वज विश्वंभरबुवा पंढरीच्या विठ्ठलाचे उपासक असून त्यांनी देहूला विठ्ठल मूर्तीची स्थापना केली होती. भागवतधर्माचा स्वीकार केलेल्या या घराण्यात पंढरीची वारी होती व त्यामुळे मोरे घराणे मद्यमांसनिवृत्त होते. हे घराणे श्रीमंत होते. कारण या घराण्यात सावकारी होती. वाण्याचा व्यवसायही होता आणि देहूगावची महाजनकीही या घराण्याकडे होती.

या संदर्भात शं.दा.पेंडसे म्हणतात, ''अशा या 'शुचि' व 'श्रीमंत' घराण्यात तुकारामांचा जन्म झाला. त्यांनी भावी आयुष्यात, भागवत धर्मप्रसाराच्या ज्या महान कार्याचा स्वीकार केला त्याला त्यांचे पिढीजात शुचित्त्वाचे संस्कारही कारणीभूत होते असे यावरून म्हणावे लागते.''(४)

घरातील श्रीमंतीमुळे तुकारामांचे बालपण सुखात गेले. त्यांचे वडील बोल्होबा हे धार्मिक वृत्तीचे होते. घराण्यात परंपरेने चालत आलेले धार्मिक उत्सव, कथा-कीर्तने, कूळ-कुळाचार त्यांनीही पुढे चालविले होते व आपल्या श्रीमंतीचा व्यय याच कामाकरिता केला होता. त्यामुळे तुकारामांच्या बालमनावर उत्कृष्ट संस्कार आपोआप होत गेले. बोल्होबांनी त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे तुकारामांचे लग्न तेराव्या वर्षी करून दिले, पण पहिली पत्नी दमेकरी झाल्यामुळे दुसरा विवाहही झाला.(५) पांगारकरांनी तुकारामांच्या जन्मशकाबद्दल चार भिन्न मते प्रगट केली आहेत, ती खालीलप्रमाणे नोंदविली आहेत.

१) कविचरित्रकार कै.जनार्दन रामचंद्रजी म्हणतात, (शके १७८२), 'तुकाराम देहू येथे शके १५१० म्हणजे इ.स. १५८८ यांत जन्मला', श.१५१०.
२) देहू व पंढरपूर येथील तुकारामांच्या वंशावळीत त्यांचा 'जन्मशक १५२० माघ शुद्ध ५, गुरुवार' असा दिला आहे, श. १५२०.
३) राजवाडे यांना वाईप्रांती सापडलेल्या एका जुन्या वंशावळीत 'तुकारामांचा जन्म शके १४९०' हा दिला आहे व राजवाडे यांनी प्रमाणांतरे देऊन तो मान्य केला आहे. श. १४९०
४) संतलीलामृतांत महिपतबाबांनी तुकारामांच्या पहिल्या २१ वर्षांची हकीकत दिली आहे ती अशी,

''तेरावे वर्षी पितयाने । संसार गळा घातला जाण ।
तेथे दक्ष येतां दिसोन । समाधान वडिलांसी ।। १३२ ।।
सतरावे वर्षी तत्त्वतां । क्रमोनि गेली मातपिता ।
वडील बंधूची कांता । तेही अवचिता निमाली ।। १३३ ।।
अठरावे वरूषीं जाणा । सावजी गेला तीर्थाटपणा ।
त्याच्या वियोगें करूनि जाणा । शोक निजमाता वाटत ।। १३४ ।।
विसाव्यात पुत्रकांता स्वयमेव । देखोनि संसारी धरिली हाव ।
आता येथोनि मन विटवावें । मग देवाधिदेवें काय केले? ।। १३५ ।।
एकविसाव्यांत विपरीतकाळ । तुकयासी पातला तत्काळ ।।
तेव्हा निघतांचि दिवाळे । सोइरे सकळ हांसती ।। १३६ ।।
अज्ञानप्रकृति ते स्त्री निश्चित । तेही निमाली अन्न अन्न करीत ।
महामोह पुत्र समस्त । लौकिकी विपरीत हे वार्ता ।। १३७ ।।
पूर्वार्ध संपले येणे रीती ।''(६)

वरील अभंगावरून तुकाराम महाराजांच्या आयुष्यातील घटनांचा क्रम खालीलप्रमाणे लावता येतो.

- तेराव्या वर्षी गळ्यात संसार पडला.
- सतराव्या वर्षी त्यांचे आई-बाप वारले व मागून वडीलभाऊ सावजी याची बायको वारली.
- अठराव्या वर्षी सावजी तीर्थाटनाला गेले.
- विसाव्या वर्षापर्यंत तीन वर्षे पुत्रकांता यासह संसार नेटका करण्याची संधी हाव धरून गाडा चांगला हाकला.
- एकविसाव्या वर्षी विपरीत काळ येऊन दिवाळे निघाले, घोर दुष्काळ पडला, तुकारामांची थोरली बायको व तिचा पुत्रही अन्न-अन्न करून मेली.

याविषयी पांगारकर म्हणतात,''महिपतबावांनी तुकारामांचा आयुष्यक्रम २१ वे वर्षापर्यंत देऊन 'पूर्वार्ध संपले येणे रीती' असे म्हटले आहे. याचा वाच्यार्थ घेतला तर त्यांचे आयुष्य ४२ वर्षांचे ठरते. बावांनी तुकारामांचे प्रयाण शक १५७१ हे

दिले आहे, त्यात ४२ वजा करिता त्यांचा जन्म शक १५२९/३० हा निघतो. 'पूर्वार्ध संपले' याचा लक्ष्यार्थ प्रपंचासक्ती सुटून ते परमार्थास लागले हा घेतला तर जन्मशक कोणताही मानण्यास प्रत्यवाय येत नाही. तथापि बहुतांनी वाच्यार्थ घेऊन जन्मशक १५३० हाच मानला आहे. श.१५३०''[७]

वि.का.राजवाडे यांनी तुकारामांचा जन्म शक १४९० हा ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. (ग्रंथमाला, क्र. ११६) व त्याला त्यांनी तीन प्रमाणे दिली आहेत.

१) त्यांना वाईप्रांती करजखोप मुक्कामी सापडलेल्या वंशावळीत तुकारामांचा जन्म शके १४९० असा दिलेला आहे.

२) निबंधमालेच्या ६४ व्या अंकात वामन विष्णु लेले यांनी एका रूमालांत एक सापडलेले पत्र प्रसिद्ध केले आहे, त्यात तुकारामांच्या गुरुपदेशाबद्दल पाच अभंग कोणी महिपतीनामक पुरुषाने केलेले दिले आहेत. त्यापैकी ४ था अभंग असा आहे.

'बाबाजीचैतन्य योगीराज धन्य । तुकयालागून प्रकटले ।। १ ।।
शालिवाहन शके चौदाशे त्र्याण्णव । प्रजापतिनाम संवत्सरी ।। २ ।।
वैशाखवद्य द्वादशीचे दिनीं । समाधी स्वामींनी घेतलीसे ।। ३ ।।
तेथूनि तिस वर्षांभेटी तुकयासी । देऊनि तयासी पूर्णपण ।। ४ ।।
महीपती म्हणे झाले समाधिस्थ । तुकया क्रीडत ब्रह्मानंदे ।। ५ ।।'[८]

वरील सर्व प्रमाणांवरून तुकारामांचे आयुष्य ८१ वर्षांचे होते असे मानता येत नाही, अर्थात त्यांचा जन्म शक १४९० इतका मागे नेता येत नाही हे मला वाटते. सर्वांस कबूल व्हावे. जन्मशक १५३० हा कबूल केल्याने सर्व चरित्राची साखळी बरोबर जुळते.

### ३. माता-पित्यांचा मृत्यू :-

बोल्होबा वृद्ध झाले तेव्हा त्यांचे वडील चिरंजीव सावजी पारमार्थिक प्रवृत्तीचे असल्यामुळे सांसारिक जबाबदारी सांभाळण्यास तयार झाले नाहीत. म्हणून दुसरे चिरंजीव तुकाराम यांच्याकडेच, संसार आणि पेठेतील सावकारी व महाजनकी सांभाळण्याचे काम आले व ते त्यांनी उत्साहाने स्वीकारले, पण नियतीच्या मनात तुकारामांना लहानशा संसारात अडकवून ठेवायचे नव्हते. आरंभीचे काही दिवस सांसारिक सुस्थितीत गेल्यानंतर दैवाने पलटी खाल्ली आणि त्यांच्यावर एकामागून एक दुःखाचे कडे कोसळू लागले. सर्व काही सुरळीत चालू असताना आणि तुकाराम उत्साहाने काम करीत असताना त्यांना कौटुंबिक आपत्तींचा पहिला तडाखा प्रेमळ मातापित्यांच्या मृत्यूने बसला. घराचा आणि पेठेतील सावकारी पेढीचा व्यवहार स्वतः तुकाराम महाराज करीत असले तरी त्यांना सल्लामसलत देण्याला त्यांचे वृद्ध वडील जोपर्यंत विद्यमान होते तोपर्यंत तुकारामांना मोठा आधार वाटत असे, पण त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षी त्यांचे वडील एकाएकी दिवंगत झाले. मागून लवकरच त्यांची माताही निर्वतली आणि मातापित्यांच्या प्रेमळ छत्राला तुकाराम अंतरले. नंतर वडीलबंधू सावजी यांची पत्नीही निवर्तली व ते तीर्थयात्रा करण्यास निघून गेले ते परत आले नाहीत. अशा रीतीने घरातील ज्या वडील मंडळीचा तुकारामांचा अप्रत्यक्ष आधार वाटत असे, तो जाऊन तुकाराम एका अर्थाने निराधार झाले.

### ४. तुकारामांचा प्रपंच :-

एका सत्वसंपन्न घरातल्या शुद्ध वातावरणात तुकाराम वाढले. आचार आणि विचार यांची स्वच्छता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महनीय विशेष आहे. तुकारामांचे व त्यांच्या दोन बंधुचे विवाह तत्कालिन पद्धतीला अनुसरून बालवयातच झाले. तुकारामांची पहिली बायको रखुमाबाई हिला दम्याच्या विकाराने ग्रासल्यामुळे खेड गावच्या गुळवे यांच्या मुलीशी तुकारामांचे दुसरे लग्न करून देण्यात आले. संसार सुरळीत चालला होता. व्यापारउदीम उत्तम होता, पण त्याची सर्वांगीण जबाबदारी तुकारामांच्या अंगावर अल्पवयातच येऊन पडली. वडिल वार्धक्याने थकत चालले होते. आपल्या मुलांनी आता घरदार, शेती, व्यापार सांभाळावा, सारे व्यवहार त्यांनी स्वतःच्या बळावर पार पाडावेत आणि आपल्याला या प्रापंचिक व्यापातून मुक्त करावे, असे त्यांना वाटू लागले. आपल्या मुलांची कर्तबगारी पाहण्यात उरलेले आयुष्य आता व्यतीत करावे

असे या वृद्ध पित्याला स्वाभाविकपणेच वाटू लागले. ज्येष्ठ पुत्र सावजी याच्यावर जबाबदारीचे ओझे टाकावे असे त्यांना वाटत होते पण सावजीचे मन फारसे उत्सुक नव्हते. निर्मलकुमार फडकुले म्हणतात,''प्रपंचापेक्षा त्याचा ओढा परमार्थाकडेच होता. व्यापारउद्योगात गुंतून राहण्यापेक्षा तीर्थयात्रा कराव्यात, भजनपूजनात रमावे इकडेच त्याच्या मनाचा विशेष कल होता. आपल्या वडिल भावाचीही उदासीन वृत्ती पाहिल्यावर तुकारामांनी संसाराची सारी सुत्रे मोठ्या निर्धाराने आपल्या हातात घेतली. आता ते एक यशस्वी वाणी म्हणून गणले जाऊ लागले. लहान वयात शिरावर पडलेली जबाबदारी परिश्रमपूर्वक पेलली पाहिजे या विचाराने ते प्रपंचात कष्ट करीत होते. यावेळी त्यांचे वय केवळ तेरा वर्षाचे होते. खरे तर या बालवयातच व्यापारउदीम सांभाळून घराण्याच्या प्रतिष्ठेला सुसंगत अशा रीतीने व्यवहार करीत राहणे कठीण असूनही तुकारामांनी या कामात यश मिळविले.''[९]

तुकारामांचा संसार बाह्यतः तरी बरा, समाधानकारक चालला होता, पण पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे नियतीची एक विध्वंसक लाट आली आणि त्यांच्या आयुष्याची घडी पूर्ण बिघडून गेली. स्वारस्य संपले. सुखस्थैर्य पाहता पाहता विरून गेले. माथ्यावरचे आभाळच जणू सर्वांगावर कोसळले. मातापित्यांचा मृत्यू झाला. यावेळी तुकारामांचे वय सतरा वर्षाचे होते. वडिलभाऊ सावजी यांची पत्नीही मरण पावली. सावजीचे लक्ष संसारात नव्हतेच. तीर्थयात्रा करण्यासाठी ते दूर निघून गेले. पुन्हा परतले नाहीत. हळव्या मनाच्या तुकारामांना हे घाव सहन करणे फारच जड गेले. पण जगरहाटीकडे लक्ष देऊन अशी संकटे गृहित धरण्याइतके ते समंजस होते.[१०]

## ५. शुद्रत्वाची जाणीव :-

आपल्या सामाजिक स्तराचा, जीवाचा उल्लेख तुकाराम असा करतात,

याति शुद्र वैश्य केला वेवसाव । आदि तो हा देव कुळ पूज्य ।।

दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात,

बरा कुणबी केलो । नाही तरी दंभेची असतो मेलो ।।

वेदाची अक्षरे वाचण्याचा आपल्याला अधिकार नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे. ही वेदना त्यांच्या काव्यात अनेक ठिकाणी प्रकट झालेली दिसते. सावकारी आणि व्यापारउदीम करीत असल्यामुळे वाणी हे बिरूद चिकटले असले तरी तुकाराम शुद्र होते, त्यांनी म्हटले आहे,

'शुद्रवंशी जन्मलो । म्हणोनि दंभे मोकलिलो ।।
अरे तूंचि माजा आता । माय बाप पंढरीनाथा ।।
घोकाया अक्षर मज नाही अधिकार ।
सर्व भावे दीन तुका म्हणे यातिहीन ।।'[११]

शुद्रवंशातल्या जन्मामुळे त्यांना विद्याभ्यास फारसा करता आला नाही. वेदशास्त्राचे आपण अध्ययन करावे अशी ओढ पुढे त्यांच्या अंतकरणात उत्पन्न झाली, पण आपण अनाधिकारी आहोत या कमालीच्या दुःखद जाणिवेने त्यांना ते वाचन करता आले नाही. पुढे आपल्या ठायी असलेल्या महनीय प्रतिभेने आणि चिंतनशक्तीने मराठी शारदेचे ते कंठमणी ठरले, तरी त्यांचे जन्मजात शुद्रत्व कधीच पुसले गेले नाही. जातिव्यवस्थेचा चिवटपणा केवढा विलक्षण असतो, संतालाही जात असते, संताची जात माणसाला विसरता येत नाही.[१२]

## ६. दुष्काळ :-

त्यानंतर थोड्याच अवधीत म्हणजे इ.स. १६२८ व १६२९ मध्ये महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडला. व्यापार बुडाला, कर्ज झाले. आर्थिक स्थिती खचली. अन्नाची भ्रांत पडू लागली. लाचारीचे शब्द उच्चारून 'विती एवढेच पोट' भरण्यासाठी भीक

**मागण्याची आपत्ती आली, ही आपत्ती त्यांना स्वतःलाच किती अपमानास्पद वाटत होती याचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रपर अभंगातून केला आहे. 'काय खावे आता कोणीकडे जावे, गावात राहावे कोण्याबळे' ही अवस्था आली.**

**दुष्काळात गुरेढोरे मेली, त्यांची पहिली पत्नी अन्नअन्न करीत तडफडून मरण पावली. तिच्यामागे त्यांचा मुलगाही गेला. या महाभयंकर कौटुंबिक आपत्तीने तुकारामांचे सारे जीवन तर उद्ध्वस्त झालेच, पण त्यांच्या मनाला शतदा तडे गेले. घरात मृत्युने थैमान घातलेले त्यांनी पाहिले. बाहेरही तो तांडव करीत होता. सहस्त्रावधी लोक अन्नाच्या अभावी रस्त्यावर प्राण सोडीत होते. जीवनाची कळा मरणाच्या काळ्याकुट्ट छायेने काळवंडून गेली होती. माणसे रडत होती, ठेचकाळत होती, तडफडत होती आणि माना टाकीत होती, हे विदारक दर्शन तुकारामांनी घडवले.**

**''संवसारे झालो अतिदुःखे दुःखी । मायबाप सेखी क्रमिलिया**
**दुष्काळ आटिले द्रव्ये नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करता मेली**
**लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे । वेवसाय देखे देखे तुटी येता ।''(१३)**

**या कौटुंबिक आपत्तीच्या जोडीला महाराष्ट्रात शके १५५०-५१ मध्ये जो भयानक दुष्काळ पडला त्यामुळे अगणित मनुष्ये व गुरेढोरे अन्नपाण्यावाचून तडफडून गेली. लोकांजवळ स्वतः खाण्यालाच अन्न नाही, पैसा नाही, होता नव्हता तो मिळेल त्या किंमतीला, मिळेल ते धान्य घेण्यात खर्च होऊन गेला. अशा स्थितीत सावकाराचे कर्ज कोण देणार? तुकारामांची सावकारी बसली आणि दिवाळे निघाले. वाण्याचा धंदा केला तोही गिऱ्हाईक नसल्यामुळे चालला नाही. बेलावरून गोणी वाहण्याचा व्यवसायही अंगाशी आला आणि एके काळी सधन असणाऱ्या तुकारामांच्या सावकारी घराण्यालाच दुषकाळाने असा तडाखा दिला की, तुकारामांचे जीवन हादरून गेले. त्यांची पहिली प्रिय पत्नी अन्न अन्न करून मेली आणि तिच्या पाठोपाठ तिचा प्रिय पुत्रही गेला. तुकारामांनी आपल्या दुर्दशेचे स्वतःच वर्णन करून ठेवले आहे.**

**तुकारामांच्या आयुष्यातील या कठिण काळाबद्दल पेंडसे लिहितात, ''घरामध्ये आईबाप, भावजय, पत्नी, मुलगा यांच्या मृत्यूमुळे तुकाराम अतिशय कष्टी झाले. दुष्काळात हजारो माणसे अन्नाविना तडफडून प्राण टाकताना तुकाराम आजुबाजूला प्रत्यक्ष पाहत होते. पण प्रत्यक्ष त्यांची पत्नी अन्न अन्न करीत मेलेली पाहून त्यांचे हृदय पिळवटून निघाले आणि मानवी जीवनाची ही परावलंबिता, दैवाधिनता आणि क्षणभंगूरता पाहून त्यांना समूळ प्रपंचे वीट आला.''**

**त्यांचा सावकारीचा धंदा बुडून दिवाळे निघाले एवढेच नव्हे तर इतरांना कर्ज देणाऱ्या या सावकारालाच कर्ज झाले. काही केल्या पुरे पडेनासे झाले, रांडापोरे भिकेला लागण्याचा प्रसंग आला. या आपत्तीतून बाहेर पडण्याची आशा नष्ट झाली आणि तुकारामांना जावे हे सर्वस्व टाकूनिया असे वाटले. (१२०७)(१४)**

**याविषयी पांगारकर म्हणतात, ''२१ व्या वर्षी पूर्वार्ध संपले हे बावांचे म्हणणे वाच्यार्थ व लक्ष्यार्थ ह्या दोन्ही प्रकारांनी खरे ठरते, जिजाई प्रयाणासमयी गरोदर होत्या. या म्हणण्यात विसंगतपणा राहत नाही. कारण मग त्या प्रयाणासमयी ३७-३७ वर्षाच्या अर्थात पुत्रोत्पादनसमर्थ अशा वयाच्या ठरतात. एकविसाव्यात विपरीतकाळ पातला. या बावांच्या म्हणण्याप्रमाणे शके १५५१ मधला महाभयानक दुष्काळाचा वणवा दक्षिणभर पेटल्याची इतिहासाची साक्ष पूर्ण पटते, कान्होबांच्या शोकाची सार्थता प्रतीतीस येते.''(१५)**

## निष्कर्ष –

**तुकारामांचे प्रपंचविज्ञान आणि समाजचिंतन किती व्यापक व सखोल आहे हे पाहिले की, तुकारामगाथा हा एक नुकताच केवळ भक्तांनी वाचावयाचा ग्रंथ नाही, हे जाणवते. समाजात आणि कौटुंबिक जीवनात सद्भावना, सुसंस्कृतपणा आणि सामंजस्य निर्माण व्हावे अशी मनिषा बाळगणाऱ्या सर्वांना ही गाथा म्हणजे एक मार्गदर्शक संहिता वाटावी, इतके तिचे महत्त्व आहे. तुकारामगाथेला म्हणूनच भगवद्गीता, कुराण आणि बायबल ह्या पवित्र ग्रंथाइतके महत्त्व आहे. तुकारामगाथा मराठी वाङ्मयाचे लेणे आहे. तुकारामांचे अभंग वजा केले तर मराठी भाषेला उणेपण येईल. आजच्या सत्तास्पर्धेत बरबटलेल्या, भांबावलेल्या आणि विमनस्क झालेल्या समाजाला या गाथेतील प्रपंचविज्ञान आणि समाजचिंतन मार्गदर्शक**

ठरणारे आहे. तुकारामांचे अभंग किंवा ज्ञानेश्वरी निवृत्त झाल्यावर हरिभक्तीसाठी वाचावयास घेतली जाते, हे दुर्दैव आहे. संस्कारक्षम आणि उमेदीच्या वयांतील समाजाने आपले मन कार्यक्षम आणि शुद्ध होण्याकरिता हे अभंग वाचले पाहिजेत.

**संदर्भ टिपा –**


१) तत्रैव, उन्नि, पृ.१.
२) फडकुले निर्मलकुमार, संतकवी तुकाराम एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९६, पृ. ९.
३) पेंडसे शं.दा., उन्नि, पृ. ३२.
४) फडकुले निर्मलकुमार, उन्नि, पृ. ११.
५) पेंडसे शं.दा., उन्नि, पृ. ०१.
६) तत्रैव, उन्नि, पृ. ०२.
७) महिपतबावा, संतलीलामृत, पृ.
८) पांगारकर ल.रा., संत तुकाराम चरित्र, वरदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पृ. ९
९) तत्रैव, उन्नि, पृ. १०.
१०) फडकुले निर्मलकुमार, उन्नि, पृ. १२.
११) तत्रैव, उन्नि, पृ. १५.
१२) कर्णिक मधु मंगेश, श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३, पृ.
१३) फडकुले निर्मलकुमार, उन्नि, पृ. १३-१४.
१४) तत्रैव, उन्नि, पृ. १६.
१५) पेंडसे शं.दा., उन्नि, पृ. २०.